




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

शुक्रवार, दि. ०२ जानेवारी २०२६








मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०४७ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com


## थोडक्यात...

### महापालिका निवडणुकीची रणनीती ठरली?

मुंबई (समर्थ गांवकरी) : एकत्र आलो आहोत ते एकत्र राहण्यासाठीच अशी घोषणा करत उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे एकत्र आले आहेत. मागच्याच आठवड्यात त्यांनी युतीची घोषणा केली. मुंबई महापालिकेत महापौर मराठीच बसेल आणि तो आमचाच असेल अशी घोषणा राज ठाकरेंनी केली. ज्याची तुम्ही वाट पाहात होतात ती घोषणा मी करतो आहे ती म्हणजे मनसे आणि शिवसेनेची युती झाली असं राज ठाकरेंनी जाहीर केलं. यानंतर जागावाटपही झालं. या सगळ्या घडामोडी घडत असताना उद्धव ठाकरेंनी शिवतीर्थ या राज ठाकरेंच्या निवासस्थानी जाऊन त्यांची भेट घेतली. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्यात चार तास बैठक पार पडली. मुंबईसह 29 महापालिका निवडणुकींच्या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्यात आज तब्बल चार तास चर्चा झाली. या चार तासांत वचननामा, सभा, रॅली आणि निवडणूक प्रचार गाण्याबाबत चर्चा झाल्याची माहिती समोर आली आहे. शुक्रवारी निवडणूक अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस असल्याने ठाकरेंच्या युतीत जर कोणी बंडखोर असतील तर त्याकडे स्थानिक पातळीवरवलक्ष देण्याबाबत चर्चा झाल्याची माहिती आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना या दोन्ही पक्षांनी जेव्हा युती केली आणि उमेदवाऱ्या जाहीर केल्या त्यानंतर बंडखोरीही झाल्याचं चित्र दिसून आलं. या बंडखोरीला शमवण्याचं मोठं आव्हानही ठाकरे बंधूंसमोर आहे. याबाबतही चर्चा झाल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

### पुण्यात एमपीएससीचे परीक्षार्थी रस्त्यावर

पुणे (समर्थ गांवकरी) : पोलीस उपनिरीक्षक पदाच्या भरती परीक्षेसाठी वयोमर्यादा वाढण्याबाबत गेल्या काही दिवसांपासून विद्यार्थ्यांकडून मागणी केली जात आहे. मात्र राज्य सरकारने याबाबतचा निर्णय घेतलेला नाही. यानंतर गुरूवारी रात्री उशीरा पुण्यातील शास्त्री रोड परिसरात स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या शेकडो विद्यार्थ्यांनी रस्त्यावर उतरत आंदोलन केल्याचे पाहायला मिळाले. यावेळी परीक्षार्थींनी आक्रमक भूमिका घेतल्याचे दिसून आले. विद्यार्थ्यांच्या मागणीसाठी वेगवेगळ्या राजकीय पक्षांच्या नेत्यांनी देखील सरकारला ही वय मर्यादा वाढवली जावी अशी मागणी केली होती. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार, रोहित पवार यांच्यासह काँग्रेसचे नेते हर्षवर्धन सकपाळ इत्यादी नेत्यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत या वय मर्यादा वाढवण्याची मागणी केली होती. पुण्यात विद्यार्थ्यांनी केलेल्या आंदोलनानंतर काही विद्यार्थ्यांना पोलिसांनी ताब्यात घेतल्याचे पाहायला मिळाले होते.

# बंडखोरी शमवण्यासाठी एकनाथ शिंदे ॲक्शन मोडमध्ये

### मध्यरात्रीपर्यंत मॅरेथॉन बैठक:90% अपक्षांची समजूत; बंडखोरी शमवण्यासाठी डाव

मुंबई : (समर्थ गांवकरी)



राज्यातील महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय हालचालींना प्रचंड वेग आला आहे. जागावाटपावरून निर्माण झालेला गोंधळ, नाराज इच्छुकांची अस्वस्थता आणि बंडखोरीच्या वाढत्या घटना यामुळे सत्ताधारी तसेच विरोधी पक्षांसमोर मोठं आव्हान उभं ठाकलं आहे. उमेदवारी न मिळाल्याने अनेक ठिकाणी अपक्ष उमेदवारांनी बंडखोरी करत थेट मैदानात उतरण्याचा निर्णय घेतला होता. अशा स्थितीत अर्ज मागे घेण्याच्या अंतिम मुदतीपूर्वी वातावरण पूर्णपणे बदलण्यासाठी राजकीय पक्षांनी अखेरची ताकद पणाला लावली असून, याच पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निवासस्थानी मध्यरात्रीपर्यंत मॅरेथॉन बैठक झाल्याची माहिती समोर आली आहे.

आगामी महापालिका निवडणुकांच्या दृष्टीने ही बैठक अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. शिंदे यांच्या निवासस्थानी उशिरापर्यंत चाललेल्या या बैठकीत शिवसेनेतील वरिष्ठ नेते, पदाधिकारी आणि अनेक अपक्ष उमेदवार सहभागी झाल्याचं सांगितलं जात आहे. विशेष म्हणजे या बैठकीत 90 टक्क्यांहून अधिक अपक्ष उमेदवारांसोबत सविस्तर चर्चा करण्यात आली. बंडखोरीमुळे युतीला फटका बसू नये, यासाठी थेट संवाद साधत समजूत काढण्यावर भर देण्यात आला. चर्चेअंती मोठ्या संख्येने अपक्ष उमेदवार अर्ज मागे घेण्यास तयार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

या मॅरेथॉन बैठकीला शिवसेनेचे नेते आणि माजी खासदार राहुल शेवाळे यांनीही उपस्थिती लावली. त्यांच्या सहभागामुळे या चर्चेला अधिक वजन प्राप्त झाल्याचं मानलं जात आहे. राहुल शेवाळे यांनी विविध मतदारसंघांतील परिस्थितीची माहिती शिंदेंसमोर मांडत, बंडखोरांमुळे होणाऱ्या संभाव्य नुकसानीवर चर्चा केली. युतीच्या उमेदवारांना बिनविरोध निवडून आणण्यासाठी आणि काही ठिकाणी होणारी तिरंगी अथवा चौरंगी लढत टाळण्यासाठी ठोस रणनीती आखण्यात आल्याची चर्चा आहे.

दरम्यान, कल्याण-डोंबिवली महापालिका निवडणुकीत शिंदे गटाच्या शिवसेनेला मोठं यश मिळाल्याचं चित्र दिसत आहे. येथे शिवसेनेचे चार उमेदवार आधीच बिनविरोध निवडून आले असून, भाजप-शिवसेना युतीचे एकूण नऊ उमेदवार बिनविरोध ठरले आहेत. यामुळे युतीने सुरुवातीच्या टप्प्यातच आघाडी घेतल्याचं मानलं जात आहे. आज अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस असल्याने आणखी काही ठिकाणी असेच बिनविरोध निकाल समोर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा अंतिम दिवस

दरम्यान, मुंबई महापालिकेसह राज्यातील सर्व महापालिकांच्या निवडणुकांसाठी आज, 2 जानेवारी रोजी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा अंतिम दिवस आहे. त्यामुळे सर्वच राजकीय पक्षांसाठी हा दिवस निर्णायक मानला जात आहे. नाराज उमेदवारांची समजूत काढणे, बंडखोरी थांबवणे आणि शक्य तिथे बिनविरोध उमेदवार निवडून आणणे, हे आजच ठरणार आहे. आजच्या निर्णयांवरच उद्याची राजकीय गणितं अवलंबून असणार असून, महापालिका निवडणुकांचा अंतिम रणसंग्राम कोणत्या स्वरूपात होणार, याचं चित्र आज स्पष्ट होणार आहे.

# महागाईचा भडका, सर्वोच्च नेते खामेनी यांच्या विरोधात आंदोलन



मुंबई : (समर्थ गांवकरी)

इराणमध्ये सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या विरोधात मागील एक आठवड्यापासून आंदोलन सुरू आहे. आता या आंदोलनाने हिंसक वळण घेतले आहे. आतापर्यंत सुरक्षा दल व आंदोलकांमध्ये झालेल्या हिंसाचारात सात जणांचा मृत्यू झाला आहे. इराणमध्ये सध्या महागाईचा भडका उडाला आहे. त्यामुळे लोक रस्त्यावर उतरून आंदोलन करत आहेत. अमेरिका व पाश्चिमात्य देशांनी इराणवर निर्बंध लादल्याने इराणमध्ये डिसेंबर महिन्यात महागाई ४२.५ टक्क्यांनी वाढली आहे. तसेच इस्रायलबरोबर जूनमध्ये चाललेल्या सात दिवसांच्या संघर्षाचाही इराणच्या अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणाम झाला आहे. या पार्श्वभूमीवर इराणमध्ये खामेनी यांना सत्तेवरून हटवण्याची मागणी जोर धरत आहे. इराणमध्ये जनतेला महागाईच्या झळा असह्य झाल्याने लोक रस्त्यावर उतरले आहेत. इराणच्या ग्रामीण भागात हिंसाचाराच्या घटना घडल्या आहेत. इराणची राजधानी तेहरानमध्ये विद्यार्थी मोठ्या संख्येने आंदोलनात उतरले असून इराणचे सर्वोच्च नेते खामेनी यांच्याविरोधात 'अयातुल्ला खामेनी मुर्दाबाद' अशी नारेबाजी करत आहेत.

### इराणमध्ये सत्तापालट होणार?

इराणमध्ये सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्याविरोधात विद्यार्थी रस्त्यावर उतरले आहेत. 'अयातुल्ला खामेनी मुर्दाबाद' असे नारे एकीकडे दिले जात असताना दुसरीकडे रझा पहलवी यांच्या समर्थनात नारे दिले जात आहेत. रझा पहलवी हे शाह मोहम्मद रझा पहलवी यांचे पूत्र आहेत. शाह मोहम्मद रझा पहलवी हे १९७९ मध्ये इराणमध्ये इस्लामिक क्रांती झाल्यानंतर अमेरिकेत पळून गेले होते. अमेरिकेशी त्यांची जवळीक असल्याने त्यांच्याविरोधात जनतेत आक्रोश होता. आता त्यांचे पूत्र रझा पहलवी यांना इराणमध्ये सुरू असलेल्या आंदोलनात समर्थन मिळत आहे. रझा पहलवी हे सध्या अमेरिकेत असून त्यांनी खामेनी यांच्या विरोधातील आंदोलनाला पाठिंबा दिला आहे. खामेनी यांना हटवल्याशिवाय इराणची अर्थव्यवस्था सुधारणार नाही, असे पहलवी यांनी 'एक्स' वर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे.

# मुंबई हायकोर्टाच्या निर्णयानंतर वीज आयोग जाणून घेणार ग्राहकांचे म्हणणे


छत्रपती संभाजीनगर : (समर्थ गांवकरी)



महावितरणने ग्राहकांचे म्हणणे एकूण न घेताच नवीन वीज दरांबाबतच पुनर्विचार प्रस्ताव सादर केला होता. वीज नियामक आयोगाने त्याला मंजुरी दिली होती. यामुळे वीज दर कमी न होता वाढले. सौर ऊर्जा ग्राहकांवर अन्याय झाला. त्यामुळे राज्यभरातून वीज ग्राहक व त्यांच्या संघटनांनी मुंबई हायकोर्टात धाव घेतली होती. यावर सुनावणी होऊन न्यायालयाने वीज दरवाढीचा आदेश रद्द केला. आता आयोगाच्या वतीने पुन्हा ई जनसुनावणी आयोजित केली आहे. ग्राहकांना त्यांचे मत मांडण्याची संधी प्राप्त झाली आहे. उच्च न्यायालयाच्या या निर्णयानंतर वीज दरवाढीचा विषय पुन्हा नियामक प्रक्रियेत आला आहे. नियमानुसार वीज दर ठरविण्यापूर्वी जनतेची मते जाणून घेणे आवश्यक असल्याने आयोगाने पुन्हा जनसुनावणी आयोजित करण्याचा निर्णय घेतला आहे. या सुनावणीत घरगुती, औद्योगिक, व्यापारी तसेच शेती आदी वीज ग्राहक, नागरीक, वीज तज्ज्ञ, अभ्यासक आदी आपली मते, हरकती आणि सूचना मांडू शकणार आहेत. वीज दरवाढीमुळे आधीच महागाईचा सामना करणाऱ्या राज्यातील तीन कोटींवर वीज ग्राहकांवर अतिरिक्त आर्थिक बोजा पडला आहे.

# गांजासह एकाला अटक, गुन्हे शाखेकडून २ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त

मुंबई : (समर्थ गांवकरी)



ओडिशा, तेलंगणातून महाराष्ट्रात होणाऱ्या अंमली पदार्थांच्या तस्करीचे रॅकेट ठाणे गुन्हे शाखेच्या मालमत्ता कक्षाने उद्ध्वस्त केले आहे. खारेगाव टोलनाक्यावर पोलिसांनी कारमधून ६३८ किलो गांजा जप्त केला असून, या कारवाईत २ कोटी १४ लाख १६ हजारांचा मुद्देमाल हस्तगत केला. याप्रकरणी तेलंगणातील तस्कराला अटक करण्यात आली आहे. मालमत्ता कक्षाचे पोलीस हवालदार जयकर जाधव यांना एका कारमधून गांजा ठाण्यात येणार असल्याची माहिती मिळाली होती. या आधारे पोलीस निरीक्षक गोरखनाथ घार्गे यांच्या नेतृत्वाखाली पथकाने खारेगाव टोलनाक्याजवळ संशयास्पद कार (क्र. एपी ०९ बीएफ-९३८२) येताच झडती घेतली असता गांजा साठवून ठेवल्याचे आढळून आले. कारवाईत पोलिसांनी चिन्ना टागुर लक्ष्मण नायक (वय ३६, रा. मेहबूबनगर, तेलंगणा) याला ताब्यात घेतले आहे. त्याच्याकडून २ कोटी ४ लाख १६ हजाराचा ६३८ किलो गांजा व १० लाख किमतीची कार, असा एकूण २ कोटी १४ लाख १६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

# निवडणुकीत जादूटोण्याचा आरोप, पराभवाचं कारण अंधश्रद्धा?

### पराभूत उमेदवाराचा गंभीर आरोप, पोलिसांच्या भूमिकेकडे लक्ष

छत्रपती संभाजीनगर : (समर्थ गांवकरी)



राज्यात सुरू असलेल्या महापालिका आणि नगरपंचायत निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अजब-अद्भुत प्रकार समोर येत आहेत. प्रचार, आरोप-प्रत्यारोप आणि बंडखोरी यासोबतच आता अंधश्रद्धा आणि जादूटोण्याच्या आरोपांनी निवडणूक प्रक्रियेला वेगळंच वळण दिलं आहे. राज्यातील विविध भागांत उमेदवारांच्या वापरातील वस्तू, पूजासाहित्य किंवा संशयास्पद वस्तू आढळून आल्याच्या घटना समोर आल्या होत्या. काही ठिकाणी याला थेट जादूटोणा असल्याचं संबोधण्यात आलं. अशाच एका गंभीर प्रकरणामुळे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात मोठी चर्चा रंगली असून, शिवसेनेच्या एका पराभूत उमेदवाराने आपल्या पराभवामागे थेट जादूटोणा कारणीभूत असल्याचा आरोप केला आहे.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील फुलंब्री नगरपंचायतीची निवडणूक 20 डिसेंबर रोजी पार पडली होती. मात्र या निवडणुकीआधीच, म्हणजे मतदानाच्या दोन दिवस आधी, प्रभाग क्रमांक 9 मधील भारत माता मतदान केंद्रासमोर संशयास्पद साहित्य आढळून आलं होतं. या साहित्याबाबत परिसरात जादूटोण्याचा संशय व्यक्त करण्यात आला होता. या घटनेमुळे स्थानिक राजकीय वर्तुळात तसेच मतदारांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झाल्याचं सांगितलं जात आहे. मतदानाच्या अगदी तोंडावर घडलेल्या या घटनेची चर्चा संपूर्ण प्रभागात पसरली होती.

या प्रकरणावर आता शिवसेनेचे प्रभाग क्रमांक 9 चे उमेदवार अमित वाहुळ यांनी थेट आरोप केले आहेत. निवडणुकीत पराभव स्वीकारताना त्यांनी आपला पराभव जादूटोण्यामुळेच झाल्याचा दावा केला आहे. अमित वाहुळ यांच्या मते, मतदान केंद्रासमोर आढळलेल्या जादूटोण्याशी संबंधित साहित्यामुळे मतदार भयभीत झाले. या भीतीपोटी अनेक मतदारांनी मतदान करण्याचा निर्णय बदलला किंवा मतदानालाच न जाण्याचा पर्याय स्वीकारला. परिणामी, याचा थेट परिणाम मतदान आणि मतमोजणीवर झाला आणि त्यातूनच आपला पराभव झाला, असा आरोप त्यांनी केला आहे.

अमित वाहुळ यांनी या संपूर्ण प्रकरणाबाबत फुलंब्री पोलिस ठाण्यात लेखी तक्रार दाखल केली आहे. निवडणूक ही लोकशाहीची अत्यंत पवित्र आणि पारदर्शक प्रक्रिया असताना, अंधश्रद्धेचा वापर करून मतदारांवर मानसिक दबाव टाकण्याचा हा गंभीर प्रकार असल्याचं त्यांनी तक्रारीत नमूद केलं आहे. निवडणुकीच्या काळात जाणीवपूर्वक अशा प्रकारे भीतीचं वातावरण निर्माण करणं हे लोकशाही व्यवस्थेसाठी धोकादायक असल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं आहे. या प्रकरणी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन आणि जादूटोणा विरोधी कायद्यानुसार संबंधित व्यक्तींवर गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी त्यांनी पोलिसांकडे केली आहे.

# विश्वासराव आरोटे यांच्या वाढदिवसानिमित्ताने दिनदर्शिका प्रकाशन व फळे वाटप!

चंद्रपूर : (समर्थ गांवकरी)




महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईच्या मूल–सावली शाखेतर्फे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या वाढदिवसानिमित्त उपजिल्हा रुग्णालय, मूल येथे सर्व वार्डातील रुग्णांना फळे वाटपाचा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. याचप्रसंगी नववर्ष २०२६ च्या दिनदर्शिकेचे प्रकाशनही मोठ्या उत्साहात पार पडले.

हा कार्यक्रम नगराध्यक्षा सौ. एकता समर्थ, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. बंडू रामटेके व डॉ. लाडे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. मूल तालुका शाखा संघटक धर्मेंद्र सुत्रपवार यांनी कार्यक्रमाची रूपरेषा मांडली.

नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. एकता समर्थ व नगरसेवक प्रशांत समर्थ यांचे स्वागत डॉ. बंडू रामटेके व डॉ. लाडे यांनी पुष्पगुच्छ देऊन केले. यावेळी राज्य पत्रकार संघाचे राज्य उपाध्यक्ष प्रा. महेश पानसे यांनी संघाच्या लोकाभिमुख कार्याची माहिती दिली.

राज्य पत्रकार संघ, मूल–सावली शाखेतर्फे प्रकाशित करण्यात आलेल्या उपयुक्त व आकर्षक "दिनदर्शिका–२०२६" चे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर उपजिल्हा रुग्णालयातील विविध वार्डांमध्ये दाखल असलेल्या सुमारे ५० रुग्णांना नगराध्यक्षा सौ. एकता समर्थ, डॉ. बंडू रामटेके, प्रा. महेश पानसे, डॉ. लाडे, नगरसेवक प्रशांत समर्थ, डॉ. तिरथ उराडे, माजी नगरपरिषद उपाध्यक्ष चंद्रकांत चटारे, सामाजिक कार्यकर्ता दत्ताजी समर्थ आदींच्या हस्ते फळे वाटप करण्यात आले.

या उपक्रमास उपजिल्हा रुग्णालयातील सर्व कर्मचारी उपस्थित राहून सहकार्य केले. कार्यक्रमास राज्य पत्रकार संघाचे मूल–सावली तालुका अध्यक्ष सतीश राजुरवार, सचिव राजेंद्र वाढई, उपाध्यक्ष रोहित कामडे, सावली तालुका उपाध्यक्ष रोशन बोरकर, प्रकाश चलाख, विवेक दुयोधन, राजेंद्र सुत्रपवार, सुशांत वाळके, सतीश सुंकरवार, जुबेद शेख यांच्यासह पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. बंडू रामटेके व डॉ. लाडे यांनी उपजिल्हा रुग्णालयातील सेवा, सुविधा व विविध उपक्रमांची माहिती देत रुग्णसेवेसाठी सर्वांचे सहकार्य अपेक्षित असल्याचे सांगून आभार मानले.

यावेळी त्यांनी रुग्णांची आपुलकीने विचारपूस करत उपजिल्हा रुग्णालयातील अखंड रुग्णसेवेचे कौतुक केले. नगराध्यक्षा म्हणून ही त्यांची पहिलीच भेट असल्याने रुग्णालय प्रशासन व कर्मचाऱ्यांनी त्यांचे स्वागत केले. या उपक्रमाबद्दल नगराध्यक्षा सौ. एकता समर्थ व डॉ. रामटेके यांनी राज्य पत्रकार संघाचे आभार मानले.

### पत्रकार संघाचा उपक्रम स्तुत्य व पुण्यशील – नगराध्यक्षा सौ. एकता समर्थ

नववर्षाचे स्वागत राज्य पत्रकार संघाच्या स्तुत्य उपक्रमाने होत असल्याचे मत नगराध्यक्षा सौ. एकता समर्थ यांनी व्यक्त केले. डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या वाढदिवसानिमित्त रुग्णांना फळे वाटप करण्याचा पुण्यशील उपक्रम आपल्या हस्ते पार पडल्याचे समाधान त्यांनी व्यक्त केले. भविष्यातही अशा सामाजिक उपक्रमांमध्ये नेहमी सहभागी होण्याची ग्वाही त्यांनी दिली.

# राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियान २०२६ ची सुरुवात




**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

नांदेड ,नांदेड परिवहन कार्यालय नांदेड च्या वतीने देशभरात सुरक्षा रस्ता सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले यावर्षी रस्ता सुरक्षा अभियान २०२६ हे दिनांक १ जानेवारी ते ३१ फेब्रुवारी या कालावधीत परिवहन विभागामार्फत राबविण्यात आले. यावेळी अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी राहुल कर्डीले , पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार,डॉ.महेशकुमार डोईफोडे,आयुक्त,नांदेड वाघाळा शहर महानगर पालीका नांदेड यांच्या हस्ते दिप प्रज्वलन करण्यात आले,यावेळी प्रादेशिक परिवहन अधिकारी, विनय शिवराम अहीरे, राम गलधर, कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड, गुट्टे, निवासी वैद्यकीय अधिकारी, नांदेड यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रशांत कंकरेज, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, नांदेड यांनी केले, यावर्षी रस्ता सुरक्षा अभियान जानेवारी १ ते ३१ या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमाची माहिती दिली,. प्रादेशिक परिवहन अधिकारी, विनय अहिरे यांनी रस्ता सुरक्षा अभियान २०२६ च्या अनुषंगाने रस्ते अपघात कमी करणेकरिता पंचसुत्रि कार्यक्रम सांगितला यामध्ये वाहन चालविताना मद्यपान करून वाहन न चालविणे, मर्यादेपेक्षा अधिक वेगाने वाहन न चालविणे, दुचाकी चालवविताना हेल्मेट चा वापर करणे, मोटार कार चालविताना सिट बेल्टचा वापर, वाहन चालवितना मोबाईलचा वापर न करणे या पंचसुत्रिचे पालन करण्याचे सांगीतले, तसेच नांदेड जिल्हागत रस्ते अपघातामध्ये २०२३- २४ च्या तुलनेत २०२४- २५ मध्ये ५. ० ४% ने वाढ झाल्याचे सांगितले.

जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांनी सर्व विभागांनी एकत्र येऊन रस्ते अपघात कमी करण्यासाठी प्रयत्नशील राहण्या विषयी सुचना दिल्या. नांदेड जिल्ह्यात डंपर हायवा यांचे धोकादायक रित्या वाहन चालविणे यामुळे होणारे अपघात कसे रोखता येतील याबाबत उपाययोजना करण्याचे सांगीतले ,तसेच प्रत्येक नागरिकांनी वाहन चालवित असताना त्यांना वाहतूक नियमांचे पालन करणेबाबत सुचना केल्या . कार्यक्रमास रस्ते की पाठशाला या पुस्तकाचे अनावरण करण्यात आले, तसेच मोटार वाहन निरिक्षक प्रदीप नन्नावरे यांनी "मी राष्ट्रीय महामार्ग बोलतोय" याविषयावर उद्धबोधनात्मक गाणे प्रकाशित केले. यावेळी श्री गुरु गोविंदसिंग औद्योगीक प्रशिक्षण संस्था (आय. टी. आय), नांदेड येथील विद्यार्थी व विविध संघटनेचे पदाधिकारी,मोटार ड्रायव्हिंग स्कुलचे संचालक, वितरकांचे मालक, प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधी असे सर्वजन २७५ व्यक्ती कार्यक्रमास उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संचलन मोटार वाहन निरिक्षक श्रीमती रेणुका राठोड यांनी केले व प्रादेशिक परिवन कार्यालयाचे परिक्षाविधीन सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी,अजित बोरकर यांनी आभार प्रदर्शन केले.

# सनशाईन स्कुल येथे खाद्य महोत्सव मोठ्या उत्साहत संपन्न



**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

दरवर्षी प्रमाणे यंदाही सनशाईन इंटरनॅशनल स्कूल कार्ला खु. तालुका बिलोली येथे ०१ जानेवारी रोजी शाळेत आयोजित खाद्य महोत्सवाचा कार्यक्रम शेकडो सहभागी विद्यार्थ्यांनी ख-या कमाईच्या उद्देशाने विक्रीसाठी ठेवलेल्या वेगवेगळ्या खाद्य पदार्थांनी आकर्षीत ठरलेले हे महोत्सव उत्साहत संपन्न झाले

दरवर्षी प्रमाणे यंदाही आज दि. ०१ जानेवारी रोजी सनशाईन इंटरनॅशनल स्कुल येथे उपस्थित प्रमुख मान्यवरांच्या हस्ते सर्वप्रथम विद्येची देवता सरस्वती मातेचे पुजन करुन पुढील कार्यक्रमाला सुरवात करण्यात आले या आयोजीत खाद्य महोत्सवात जवळपास चारशे विद्यार्थी सहभागी झाले होते.या महोत्सवात विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या वेगवेगळ्या खाद्य पदार्थांचे स्टॉल उभारण्यात आले होते. या स्टॉलमार्फत विद्यार्थी व पालकांनी खाद्य पदार्थांची खरेदी करीत आनंद लुटला. विद्यार्थ्यांनी गुलाबजाम, पाणीपुरी, केक, लस्सी, भेल, इडली, वडा, मिसळ,गाजर हलवा, आईस्क्रीम असे विविध खाद्यपदार्थांची विक्री केली . या वेळी पालकवर्ग, शिक्षकवृंद,विद्यार्थ्यांनी आवडी निवडीतुन खरेदी केलेल्या पदार्थाची चव घेत समाधान व्यक्त केले. विद्यार्थ्यानी विक्री केलेल्या या ख-या कमाईची एकूण जमा झालेली रक्कम व शाळेच्या वतिने अनाथ आश्रमला दरवर्षी मदत केली जाते.

या आयोजीत कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बिलोली पो. ठाणे स.पो.नि. कमल शिंदे प्रमुख पाहुणे पत्रकार संघाचे मराठवाडा उपाध्यक्ष राजु पाटील शिंपाळकर सामाजिक कार्यकर्ते सय्यद रियाज ,लक्ष्मीकांत कलमुर्गे संस्थेचे चेअरमन सत्यनारायण मेरूगु प्राचार्या प्रेमा मेरगु ,स्नेहा मेरगु,अनिल तमलुरे याच्यासह शिक्षकवृद,पालक वर्ग मोठ्या संख्येनी उपस्थित होते.

# श्रीगोंदा नगरपालिकेत भाजप गटबांधणी पूर्ण

- सत्ताधारी गटाला दिशा देणारी नेतृत्व निवड
- श्रीगोंदा नगरपालिकेत भाजप गटनोंदणी पूर्ण
- गटनेतेपदी सुनीता खेतमाळीस, उपगटनेतेपदी मीरा शिंदे



**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

श्रीगोंदा नगरपालिकेतील सत्ताधारी भाजप गटाची अधिकृत गटनोंदणी जिल्हाधिकारी कार्यालय अहिल्यानगर येथे पूर्ण होताच पालिकेतील राजकारणाला स्पष्ट दिशा मिळाली आहे. नगरपालिकेत भाजपचे १३ नगरसेवक व नगराध्यक्ष विजयी झाले असून, या संख्याबळाच्या जोरावर पालिकेच्या कारभारावर भाजपचा ठसा अधिक ठळक होणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

या प्रक्रियेत भाजप गटनेतेपदी नगराध्यक्ष सुनीता खेतमाळीस यांची, तर उपगटनेतेपदी मीरा शिंदे यांची निवड करण्यात आली. यासोबतच सचिवपदी वंदना घोडके आणि खजिनदारपदी अश्विनी काळे यांची नियुक्ती जाहीर करण्यात आली. या नियुक्त्यांमुळे सत्ताधारी गटाची संघटनात्मक बांधणी पूर्ण झाली असून, आगामी पाच वर्षांच्या विकासात्मक निर्णयांसाठी सक्षम टीम तयार झाल्याचे चित्र आहे. नगरपालिकेच्या सभागृहात कामकाज सुरळीत चालवणे, प्रशासनाशी समन्वय राखणे, विकासकामांचे प्राधान्यक्रम ठरवणे आणि राजकीय रणनीती आखणे या दृष्टीने गटनेते पदाला विशेष महत्त्व असते. सुनीता खेतमाळीस यांच्या अनुभवाचा फायदा पालिकेच्या कारभाराला होईल, अशी अपेक्षा भाजप वर्तुळातून व्यक्त होत आहे.

# विद्यार्थ्यांना शालेय किटचे वाटप

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

चाईल्ड फंड इंडिया,पंचायत समिती जुन्नर, प्राथमिक आरोग्य केंद्र,मढ,गौरीशंकर सामाजिक प्रतिष्ठान, हाय स्पीड स्किल हब, मराठा चेंबर्स प्रतिष्ठान अँड एग्रीकल्चर तसेच ग्रामपंचायत कोपरे यांच्या संयुक्त सहकार्याने महिलांसाठी एकदिवसीय मोफत डिजिटल मार्केटिंग कार्यशाळा व मोफत उद्यम आधार वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.या कार्यशाळेत साधारणपणे ५५ महिलांचा उत्स्फूर्त सहभाग नोंदवण्यात आला.तसेच, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,कोपरे येथील ३५ विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्य (एज्युकेशनल मटेरियल) वाटप करण्यात आले. याच उपक्रमाअंतर्गत गावातील नागरिकांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजनकरण्यात आले.

# वन्यजीव व मानव संघर्ष या विषयावर मेजर रमेश खरमाळे यांचे मार्गदर्शन

**बेल्हे : (समर्थ गांवकरी)**

समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित, समर्थ कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स बेल्हे आणि सामाजिक वनीकरण परिक्षेत्र जुन्नर, विभाग पुणे व पंचायत समिती जुन्नर यांच्या संयुक्त विद्यमाने वन्यजीव व मानव यांच्यात वाढत चाललेल्या संघर्षाबाबत जनजागृतीपर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन नुकतेच समर्थ शैक्षणिक संकुल बेल्हे येथे करण्यात आले होते.



वन्यजीव अभ्यासक तथा माजी सैनिक मेजर रमेश खरमाळे हे या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते.

मेजर रमेश खरमाळे यांनी मानववस्ती आणि जंगल क्षेत्र यांच्यातील सीमारेषा कमी होत असल्यामुळे वन्यजीव व मानव यांच्यातील संघर्ष कसा वाढत आहे,याची कारणे स्पष्ट केली. वन्यजीवांचे नैसर्गिक अधिवास जपणे,अन्नसाखळीचे संतुलन राखणे आणि मानवी हस्तक्षेप मर्यादित ठेवणे यावर त्यांनी विशेष भर दिला. बिबट्या,तरस,रानडुक्कर आदी वन्यप्राण्यांशी सामना झाल्यास घ्यावयाची काळजी,अफवांवर विश्वास न ठेवता वनविभागाशी तात्काळ संपर्क साधण्याचे महत्त्व,तसेच आपत्कालीन परिस्थितीत योग्य व सुरक्षित वर्तन कसे असावे याबाबत त्यांनी प्रात्यक्षिकांसह उपस्थित विद्यार्थ्यांना माहिती दिली.

या कार्यक्रमामुळे वन्यजीव संरक्षणाबाबत सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होऊन मानव व निसर्ग यांच्यात सुसंवाद साधण्यास मदत होईल.कार्यक्रमाच्या शेवटी प्रश्नोत्तर सत्रात विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची तसेच शंकांचे सविस्तरपणे व सकारात्मक पद्धतीने समाधान केले.

या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके,उपाध्यक्ष माऊलीशेठ शेळके,सचिव विवेक शेळके,विश्वस्त वल्लभ शेळके,माजी जिल्हा परिषद सदस्या स्नेहलताई शेळके,कॅम्पस डायरेक्टर प्रा.राजीव सावंत,प्राचार्य डॉ.उत्तम शेलार,डॉ.लक्ष्मण घोलप तसेच सर्व विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.प्रणाली साळुंके यांनी तर आभार प्रा.कीर्ती शिंदे यांनी मानले.

# सेवेला सलाम! ढवळगाव येथे शौर्य दिनानिमित्त अन्नदान

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

भिमा कोरेगाव शौर्य दिन हा केवळ इतिहासाचा स्मरणदिन नसून, सामाजिक बांधिलकी आणि मानवतेची शिकवण देणारा दिवस आहे. ढवळगाव येथे एरंडोली येथील माता रमाई माता भिमाई महिला बचत गटातर्फे भिमा कोरेगाव शौर्य दिनानिमित्त तालुक्यातून येणाऱ्या भिम अनुयांना शौर्य दिनाला मानवंदना देण्यासाठी जाणाऱ्या भाविकांना चहा नाष्ट्याची सुविधा ढवळगाव येथे उपलब्ध करून देण्यात आली होती .




महिला बचत गटांनी उचललेले अन्नदानाचे पाऊल हे शौर्याला केवळ शब्दांत नव्हे, तर सेवेतून दिलेले सच्चे अभिवादन ठरले. भिम अनुयायांच्या वाटचालीत दिलेला हा उल्पोहार म्हणजे समतेचा, बंधुत्वाचा आणि प्रेरणेचा संदेश आहे. अशीच सामाजिक जाणीव व सेवा भावना समाजात रुजत राहिली, तर परिवर्तनाचा मार्ग अधिक सशक्त होईल यावेळी भिमा कोरेगाव येथे मानवंदना देण्यासाठी तालुक्यातून मोठ्या प्रमाणात भिम अनुयायी जात असतात . भिम अनुयांनी बचत गटांचे कौतुक केले . श्रीगोंदा पत्रकार संघाचे उपाध्यक्ष पंकज गणवीर यांचे वतीने दोन्ही बचतगटांच्या अध्यक्षांचा शाल श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला . माता रमाई बचत गटाच्याअध्यक्ष मिना राजू शिंदे माता भिमाई बचतगटाच्या अध्यक्ष मंदा संतोष शिंदे यांचा लता संजय औचिते यांच्या हस्ते शाल श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला . कार्यक्रम यशस्वितेसाठी मिना नितिन शिंदे . गौरी शिंदे, दिपाली शेंडगे मनिषा थोरात ,लता संजय औचिते पोपट शिंदे राजेंद्र शिंदे . बापू बोरगे विठल शिंदे भाऊसाहेब शिंदे सुनिल शिंदे जवाहर पठारे यांनी विशेष परिश्रम घेतले .' यावेळी वंचितचे तालुकाध्यक्ष संतोष जौंजाळ , श्रीगोंदा पत्रकार संघाचे उपाध्यक्ष पंकज गणवीर सुनिल शिंदे , राहुल बोरगे , बाळासाहेब पठारे , सोन्याबापू बोरगे , परिसरातील बहुसंख्य नागरिक तसेच भिम अनुयायी उपस्थित होते.

# वाशीतील पाम बीच रोडवर कडेकोट बंदोबस्त!

**नवी मुंबई : (समर्थ गांवकरी)**

नववर्षाच्या स्वागताच्या पार्श्वभूमीवर काल (31 डिसेंबर) रात्री एपीएमसी वाहतूक विभागाकडून वाशीतील पाम बीच रोड परिसरात कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. सेक्टर 17 प्लाझा परिसरात मोठ्या प्रमाणावर पोलिसांचा बंदोबस्त ठेवण्यात आला होता. नववर्षाच्या जल्लोषासाठी नागरिकांची मोठी गर्दी होण्याची शक्यता लक्षात घेऊन वाहतूक सुरळीत राहावी तसेच कायदा-सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी विशेष उपाययोजना करण्यात आल्या होत्या. या वेळी वाहतूक पोलिसांनी वाहनांची तपासणी करत मद्यप्राशन करून वाहन चालवणाऱ्यांवर विशेष लक्ष केंद्रित केले. रात्री उशिरापर्यंत वाहतूक पोलिसांचा कडक बंदोबस्त सुरू होता.

# मेहनत, निष्ठा आणि सेवाभावातूनच खरा विकास

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

मेहनत, निष्ठा आणि सेवाभाव या त्रिसूत्रीवरच खरा व शाश्वत विकास उभा राहतो, असे प्रतिपादन दि. अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालिका अनुराधाताई राजेंद्रदादा नागवडे यांनी केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागांतर्गत व श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, श्रीगोंदा यांच्या संयुक्त विद्यमाने उक्कडगाव येथे आयोजित सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोपप्रसंगी त्या बोलत होत्या. हा समारोप कार्यक्रम बुधवार दि. ३१ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता उत्साहात पार पडला.

शाश्वत विकासासाठी युवक : पाणलोट आणि पडीक जमीन व्यवस्थापन या संकल्पनेवर

**अनुराधाताई नागवडे**

आधारित हे शिबिर दि. २१ ते ३१ डिसेंबर या कालावधीत राबविण्यात आले. या शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना ग्रामीण जीवनशैलीचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला. घरापासून दूर राहून स्वतःची कामे स्वतः करणे, नियोजनबद्ध दिनचर्या पाळणे व ग्रामस्थांचे जीवन जवळून पाहण्याची संधी स्वयंसेवकांना मिळाली.

शिबिरादरम्यान घासावा शब्द तासावा शब्द, पाणी-वाणी-नाणी नासू नये, युवकांनो जागे व्हा, पर्यावरण संवर्धन, व्यक्तिमत्त्व विकास, आरोग्यधन संपदा आदी विषयांवर विविध मान्यवरांनी मार्गदर्शन केले. ग्रामस्थांमध्ये सचिन कातोरे , शंकर गोलांडे यांनी मनोगत व्यक्त केले . अध्यक्षीय भाषणात अनुराधाताई नागवडे म्हणाल्या की, राष्ट्रीय सेवा योजनेमुळे विद्यार्थ्यांमध्ये सेवाभाव, शिस्त, नेतृत्वगुण व सामाजिक बांधिलकी निर्माण होते. समाजाच्या सर्वांगीण विकासात युवकांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

या कालावधीत एनएसएस स्वयंसेवकांनी श्रमदान, स्वच्छता मोहीम, पाणलोट क्षेत्र जनजागृती, पडीक जमीन व्यवस्थापन, वृक्षलागवड, प्रभातफेरी, व्याख्यानमाला व सामाजिक प्रबोधनात्मक उपक्रम यशस्वीरीत्या राबविले. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये स्वच्छता, पर्यावरण संरक्षण व सामाजिक ऐक्याबाबत सकारात्मक जागृती निर्माण झाल्याचे मान्यवरांनी नमूद केले.

कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य सतीशचंद्र सूर्यवंशी व राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी यांनी स्वयंसेवकांच्या कार्याचे विशेष कौतुक केले.

# ज्योती आवाज नागरी सहकारी पतसंस्थेतर्फे २०२६ कॅलेंडरचे वितरण



**राजगुरूनगर : (समर्थ गांवकरी)**

राजगुरूनगर (ता. खेड) येथील ज्योती आवाज नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित यांच्या वतीने सन २०२६ चे आकर्षक दिनदर्शिका (कॅलेंडर) वितरण कार्यक्रम उत्साहात पार पडला. सदर कॅलेंडर वितरण माननीय संचालक श्री. जयंत काशिनाथ घोरपडे यांच्या शुभहस्ते सभासद, ठेवीदार व नागरिकांना करण्यात आले.

या प्रसंगी बोलताना माननीय श्री. जयंत घोरपडे यांनी सांगितले की, ज्योती आवाज पतसंस्था ही गेल्या अनेक वर्षांपासून विश्वास, पारदर्शकता व सभासदाभिमुख सेवांच्या जोरावर प्रगतीपथावर आहे. संस्थेने आर्थिक शिस्त, सक्षम व्यवस्थापन व लोकाभिमुख धोरणे राबवून अल्पकालावधीतच उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

# प्राचार्य डॉ. सतीशचंद्र सूर्यवंशी यांना राज्यस्तरीय गंगाजी बाबाजी आदर्श प्राचार्य पुरस्कार

## ग्रामीण शिक्षणाच्या उज्वल भविष्यासाठी झटणाऱ्या नेतृत्वाचा गौरव

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

ग्रामीण भागातील उच्च शिक्षणाला नवी दिशा देणारे, विद्यार्थीकेंद्री शिक्षणव्यवस्था उभारणारे आणि प्रशासन, अध्यापन व सामाजिक बांधिलकी यांचा सुंदर समन्वय साधणारे श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, श्रीगोंदा येथील प्राचार्य डॉ. सतीशचंद्र सूर्यवंशी यांना राज्यस्तरीय गंगाजी बाबाजी आदर्श प्राचार्य पुरस्कार जाहीर झाला. हा मानाचा पुरस्कार माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या हस्ते दि. १ जानेवारी २०२६ रोजी एका भव्य समारंभात प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार म्हणजे केवळ एका व्यक्तीचा सन्मान नसून, ग्रामीण



शिक्षणाच्या पुनरुज्जीवनाची दखल असल्याचे मत त्यावेळेस उपस्थित व्यक्तींनी मांडले

डॉ. सूर्यवंशी यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाखाली श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाने NAAC चे A+ मानांकन प्राप्त केले. ग्रामीण भागातील महाविद्यालयासाठी हे मानांकन मिळवणे ही अत्यंत कठीण व आव्हानात्मक बाब असते.

शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन संस्कृती, पायाभूत सुविधा, विद्यार्थी विकास, प्रशासनातील पारदर्शकता व समाजाभिमुख उपक्रम या सर्व घटकांमध्ये महाविद्यालयाने केलेली भरीव प्रगती या मानांकनामागे आहे.

यासाठी संस्थेचे अध्यक्ष राजेंद्रदादा नागवडे यांचे धोरणात्मक पाठबळ, संचालक मंडळाची सकारात्मक भूमिका आणि प्राचार्यांचे सक्षम नेतृत्व यांचा सुंदर मेळ घडून आला.

महाराष्ट्रातील नामांकित महाविद्यालयांमध्ये प्राचार्य म्हणून काम करण्याच्या संधी उपलब्ध असतानाही, "ज्या महाविद्यालयात मी घडलो, ज्या मातीतून मला ओळख मिळाली, त्याच महाविद्यालयाच्या विकासासाठी आयुष्य देणे अधिक महत्त्वाचे आहे" या मूल्याधिष्ठित भूमिकेतून डॉ. सूर्यवंशी यांनी श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, श्रीगोंदा येथेच प्राचार्य म्हणून कार्यभार स्वीकारला.

स्वर्गीय माजी आमदार शिवाजीराव नागवडे (बापू) यांनी पाहिलेल्या ग्रामीण शिक्षणाच्या स्वप्नपूर्तीसाठी आपणही खारीचा वाटा उचलावा, ही त्यामागील प्रेरणा होती

प्राचार्यपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर डॉ. सूर्यवंशी यांनी शिक्षणाला रोजगाराशी जोडण्यावर विशेष भर दिला.

त्याचा परिणाम म्हणून गेल्या वर्षी व चालू वर्षात पोलीस व भारतीय सैन्य दलात १२१ विद्यार्थ्यांची निवड २०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांची निमसरकारी विभागात नियुक्ती झाली आहे.

ही आकडेवारी ग्रामीण भागातील महाविद्यालयासाठी अभिमानास्पद व प्रेरणादायी आहे.

महाविद्यालयात करिअर कट्टा स्थापन करून विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा, पोलीस-लष्करी भरती, मार्गदर्शन वर्ग, व्यक्तिमत्व विकास व मुलाखत प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

विशेष म्हणजे, डॉ. सूर्यवंशी हे करिअर कट्टा पूर्व पोलीस भरती प्रशिक्षण या राज्यस्तरीय संस्थेचे अध्यक्ष असून, त्यांचा व्यापक अनुभव थेट विद्यार्थ्यांना लाभतो.

डॉ. सूर्यवंशी यांचा शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन केवळ गुणांपुरता मर्यादित नसून —

मानसिक विकास, बौद्धिक प्रगल्भता,शारीरिक तंदुरुस्ती,शिस्त,देशभक्ती व सामाजिक जाणीव

या सर्व बाबींवर ते समान भर देतात. डॉ. सूर्यवंशी हे गेल्या ३६ वर्षांपासून प्राणिशास्त्र (Zoology) विषयाचे प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.

तसेच त्यांनी NCC चे प्रमुख म्हणून २५ वर्षे सेवा बजावली असून, लेफ्टनंट, कॅप्टन व मेजर या पदांवर त्यांनी यशस्वी कामगिरी बजावली आहे.

# डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय वस्तूंचे वाटप!

**पत्रकार संजय गायकर यांच्या पुढाकारातून सामाजिक उपक्रम!**





**ब्राम्हणवाडा (ता. अकोले) : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हा परिषद शाळा, येसापूर येथे शालेय विद्यार्थ्यांना शालेय वस्तूंचे वाटप करण्यात आले. हा उपक्रम दैनिक समर्थ गांवकरीचे वृत्त संपादक तसेच महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे अकोले तालुका संपर्क प्रमुख पत्रकार संजय गायकर यांच्या पुढाकारातून पार पडला.

यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांना ड्रॉइंग बुक, वह्या, पेन्सिल, खोड रबर, रंगीत खडू (कलरचे खडू) तसेच गोड खाऊ असे शालेय साहित्य वितरित करण्यात आले.

डॉ. विश्वासराव आरोटे हे वर्षभर सामाजिक बांधिलकी जपत शालेय विद्यार्थी, गोरगरीब व वंचित घटकांसाठी विविध उपक्रम राबवत असतात. शालेय विद्यार्थ्यांना एक लाख वह्या वाटप करण्याचे त्यांचे उद्दिष्ट असून, त्या अनुषंगाने संपूर्ण महाराष्ट्रात विविध ठिकाणी शालेय साहित्याचे वाटप केले जाते. यासोबतच ऊसतोड कामगार महिलांना साड्या व स्वेटर, तसेच गरजू कुटुंबांना किराणा व आर्थिक मदतही नियमितपणे दिली जाते.

या सामाजिक कार्यातून प्रेरणा घेत पत्रकार संजय गायकर हे दरवर्षी डॉ. आरोटे यांच्या वाढदिवसानिमित्त परिसरातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटपाचा उपक्रम राबवत असतात. यावर्षीदेखील हा उपक्रम येसापूर येथील जिल्हा परिषद शाळेत उत्साहात पार पडला.

हा कार्यक्रम ब्राम्हणवाडा ग्रामपंचायतीचे उपसरपंच सुभाष गायकर, सदस्य रवींद्र हांडे, सदस्य शिवाजी आरोटे, करंडी गावचे माजी सरपंच चंद्रकांत गोंदके, समाजसेविका शारदाताई गायकर, सौ. दिपाली संजय गायकर, उद्योजक अक्षय गणपत आरोटे, स्वप्निल आरोटे, ग्रामस्थ अरुण आरोटे, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष बबन आरोटे, जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापिका घुले मॅडम, देवकर मॅडम तसेच आनंदा धोंडीबा आरोटे, शिवाजी दगडू आरोटे आदी मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाला!

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित मान्यवरांनी डॉ. विश्वासराव आरोटे यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देत त्यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले.

# डॉ. हेमंत धुमाळ यांची कार्यकारी संचालकपदी नियुक्ती

■ **श्रीगोंद्याच्या शिरपेचात मानाचा तुरा**



**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

श्रीगोंद्याचे भूमिपुत्र डॉ. हेमंत धुमाळ यांची महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या (MKVDC) कार्यकारी संचालक (Executive Director) पदी नियुक्ती करण्यात आली आहे. जलसंपदा क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव आणि उत्कृष्ट प्रशासकीय कार्याची पावती म्हणून राज्य शासनाने त्यांच्या पदोन्नतीवर शिक्कामोर्तब केले. त्यांच्या नियुक्तीने श्रीगोंदा तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात अभिमानाचे वातावरण आहे.

ग्रामीण भागातील अधिकाऱ्याने राज्याच्या जलसंपदा विभागातील सर्वोच्च पदांपैकी एक असलेल्या 'कार्यकारी संचालक' पदापर्यंत मजल मारल्याने त्यांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे कृष्णा खोऱ्यातील सिंचन प्रश्नांना तांत्रिक आणि प्रशासकीय अशा दोन्ही स्तरांवर न्याय मिळेल, अशी आशा व्यक्त केली जात आहे. डॉ. हेमंत धुमाळ यांनी जलसंपदा विभागात आपल्या कारकिर्दीची सुरुवात केल्यानंतर गेल्या ३० वर्षांहून अधिक काळ विविध पदांवर काम केले आहे. या नियुक्तीपूर्वी ते याच महामंडळात मुख्य अभियंता (जलसंपदा) म्हणून यशस्वीरीत्या कार्यरत होते. याआधी त्यांनी पुणे विभागात कार्यकारी अभियंता आणि अधीक्षक अभियंता यांसारख्या महत्त्वाच्या पदांवर राहून अनेक सिंचन प्रकल्पांना गती दिली आहे.

महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ हे राज्याच्या सिंचन क्षेत्रातील सर्वात मोठे महामंडळ मानले जाते. कार्यकारी संचालक म्हणून डॉ. धुमाळ यांच्यावर कृष्णा खोरे क्षेत्रातील धरणे, कालवे आणि वितरिकांचे सूक्ष्म नियोजन करणे यासारख्या जबाबदाऱ्या राहणार आहेत.

# ३३ केव्ही वीजपुरवठा तत्काळ सुरळीत करा

■ **भाजपा महिला तालुकाध्यक्ष अनिता जाधव यांची मागणी**



**भोकर : (समर्थ गांवकरी)**

भोकर तालुक्यातील मौजे मातुळ येथे गेल्या अनेक दिवसांपासून थ्री-फेज वीजपुरवठा खंडित असून शेतकऱ्यांचे मोठे हाल होत आहेत. मातुळ येथील ३३ केव्ही पिपळगाव सर्कलवर शेतकऱ्यांच्या मोटारी व बोअरवेलचा मोठ्या प्रमाणावर लोड असल्याने वारंवार वीज खंडित होत आहे. परिणामी शेतकऱ्यांना पूर्ण क्षमतेने वीजपुरवठा मिळत नसल्याचे चित्र आहे.

वीजपुरवठा सतत ये-जा करत असल्याने शेतातील कामे रखडली असून अनेक पिकांना वेळेवर पाणी देणे शक्य होत नाही. मोटार सुरू–बंद करण्यासाठी शेतकऱ्यांना अंधारात डीपीकडे जावे लागत असून यामुळे त्रासाबरोबरच अपघाताचा धोका वाढला आहे. वेळेवर पाणी न मिळाल्याने पिकांचे नुकसान होत असल्याचेही शेतकरी सांगत आहेत. वीज नसल्याने शेतातील दैनंदिन कामे करणे अत्यंत कठीण झाले आहे.

या पार्श्वभूमीवर मातुळ येथील ३३ केव्ही वीजपुरवठ्यावरचा ताण कमी करण्यासाठी नवीन ३३ केव्ही लाईन सुरू करावी व तात्काळ वीजपुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी भारतीय जनता पार्टीच्या महिला तालुका अध्यक्ष सौ. अनिता जाधव यांनी महावितरणचे माननीय कार्यकारी अभियंता यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

# प्रशांत भामरे यांची निवडणुकीतून माघार

**मनिलाल शिंपी : (समर्थ गांवकरी)**

राजकारण हे केवळ पद, तिकीट किंवा निवडणूक जिंकण्यापुरते मर्यादित नसून ते जनसेवा, निष्ठा आणि सातत्यपूर्ण संघर्षाचे माध्यम असते. अशाच निष्ठेचा, सेवाभावाचा आणि संघर्षशील नेतृत्वाचा एक ठळक चेहरा म्हणजे प्रशांत भामरे आदरणीय उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे व खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांचे निष्ठावंत कार्यकर्ते म्हणून गेली 30 वर्ष प्रामाणिकपणे कार्य करत आलेले आहे प्रशांत भामरे सर यांची ओळख केवळ पक्षांतर्गतच नव्हे तर इतर सर्व पक्ष व सर्वसामान्य जनतेतही दृढपणे रुजलेली आहे. राजकारणाकडे संधी म्हणून नव्हे तर सेवेचे व्रत म्हणून पाहणाऱ्या या कार्यकर्त्याने गेली अनेक वर्षे कल्याण शहरात अखंडपणे काम केले आहे.

# राज्याभिषेक सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित रहा

**भोकर : (समर्थ गांवकरी)**



पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यातील कील्ले वाफगांव याठीकानी सोमवार दिनांक ६ जानेवारी २०२६ महाजा यशवंतराव होळकर यांच्या स्मृती दिनानिमित्त आयोजित सोहळ्यास महाराष्ट्र राज्यातील तमाम धनगर समाज बांधवांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे व सहभागी व्हावे असे आवाहन महाराजा यशवंतराव होळकर (प्रथम) राज्याभिषेक महोत्सव समितीचे नांदेड जिल्हा प्रतिनिधी नागोराव शेंडगे बापू यांनी केले आहे.

पक्ष संघटना व आप-आपसातील हेवेदावे,विसरुन सामाजिक बांधिलकी व जाणिवेतून आपन फक्त धनगर आहोत या जाणिवेने धनगर समाज बांधवांनी एकत्र येऊन चक्रवर्ती सम्राट महाराजा यशवंतराव होळकर यांच्या राज्याभिषेक स्मृती दिनानिमित्त आयोजित सोहळ्यास उपस्थित राहून एका ऐतिहासिक सोहळ्याचे साक्षीदार व्हावे.शुर लढवय्ये,विर पराक्रमी यशवंतराव होळकर यांचे वारसदार असल्याचा अभिमान धनगर समाजांनी बाळगला उरासी पाहिजे.चक्रवर्ती सम्राट महाराजा यशवंतराव होळकर हे छत्रपती शिवरायांच्या नंतरचे एकमेव असे राजे आहेत की, त्यांनी आपल्या वयाच्या अवघ्या २४ व्या वर्षी म्हणजे ६ जानेवारी १८०५ रोजी वैदिक पद्धतीने आपला राज्याभिषेक केला.पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यातील कील्ले वाफगांव या ठिकाणी येत्या दिं.६ जानेवारी २०२६ रोजी महाराजा यशवंतराव होळकर राज परिवार , प्रमुख लोकप्रतीनिधी यांच्या हस्ते व प्रमुख संघटना प्रतीननिधींच्या उपस्थितीत पुष्प वर्षाव केला जाणार आहे.यासाठी कींतू-परंतू न ठेवता हजारोंच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन महाराजा यशवंतराव होळकर (प्रथम) राज्याभिषेक महोत्सव समितीचे नांदेड जिल्हा प्रतिनिधी नागोराव शेंडगे बापू यांनी धनगर समाज बांधवांना केले आहे.होळकर घराण्याचे वंशज भुषनसिंह राजे होळकर यांच्या माध्यमातून गेली अनेक वर्षांपासून महाराजा चक्रवर्ती यशवंतराव होळकर यांच्या राज्याभिषेक स्मृती दिनानिमित्ताने हा सोहळा आयोजित केला जातो. या कार्यक्रमाला राज्यभरातील होळकर घराण्याचे वंशज व लोकप्रतिनिधी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहतात.

# शिवाजीमामा नाईकवाडी व शुभम गायकर यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय साहित्य व स्वेटर वाटप!

**डॉ. विश्वासराव आरोटे यांचा स्तुत्य उपक्रम!**

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

समाजातील दानधर्म हा केवळ धार्मिक स्थळांपुरता मर्यादित न राहता तो शिक्षणासाठी, शाळा व विद्यार्थ्यांसाठी व्हावा, कारण शाळा हेच खरे मंदिर असून येथेच उद्याच्या भारताचे नागरिक घडत असतात, असे प्रेरणादायी मत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी व्यक्त केले.

अकोले तालुक्यातील आढळा परिसरातील देवठाण येथे असलेल्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मेनखिंडवाडी येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा प्रगतशील शेतकरी शिवाजीमामा नाईकवाडी व शुभम गायकर यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांसाठी शालेय साहित्य, स्वेटर तसेच मिठाई वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात डॉ. आरोटे प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

डॉ. आरोटे पुढे म्हणाले की, “आज समाजातील अनेक घटक दानधर्म करतात; मात्र तो जर थेट शालेय विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचला, तर त्याचे दूरगामी परिणाम दिसून येतात. या शाळेतूनच उद्याचे डॉक्टर, अभियंते, अधिकारी, पत्रकार, शेतकरी व जबाबदार नागरिक घडणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनीही हे ऋण लक्षात ठेवून भविष्यात उच्च पदावर पोहोचल्यानंतर आपल्या शाळेला मदतीचा हात द्यावा.” या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद झळकला.









थंडीत स्वेटर व शालेय साहित्य मिळाल्याने पालकांनीही समाधान व्यक्त केले. कार्यक्रमास दैनिक समर्थ गांवकरीचे महाव्यवस्थापक संजय फुलसुंदर, शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती पोर्णिमा दारोळे, शिक्षक दत्तात्रय आव्हाड, रावसाहेब वाकचौरे, बी. एल. भालेराव यांच्यासह शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी उपस्थित मान्यवरांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# अद्वैत जाधव ठरला सामनावीर

**भिवंडी : (समर्थ गांवकरी)**

भिवंडी तालुका क्रिकेट असोशियन आयोजित लेदरबॉल क्रिकेट स्पर्धेत समतानगर येथिल अद्वैत अमोल जाधव सामनावीर ठरला आहे. लेट कमल लोहिया इंटर स्कूल आणि १६ वर्षांखालील क्लब क्रिकेट स्पर्धा २०२५-२६ आयोजन भिवंडीतील बी. एन. एन महाविद्यालयातील मैदानावर नुकतेच आयोजित करण्यात आल्या होत्या. या तालुका क्रिकेट स्पर्धेत पडघा ,समतानगर येथिल कु. अद्वैत अमोल जाधव याने गोलंदाज म्हणून उत्कृष्ट गोलंदाजी करून ४ षटकात १ षटक निर्धाव टाकून फक्त १९ धावा दिल्या. व ५ फलंदाज बाद केले. त्याच्या उत्कृष्ट खेळीमुळे कु. अद्वैत अमोल जाधव सामनावीर ठरला आहे.सामनावीर ठरलेल्या अद्वैत जाधव याला मेडल व ज्या लेदर चेंडूने पाच फलंदाज बाद केले.

# अकोले तालुक्यातील ब्राम्हणवाडा शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप!

**ब्राम्हणवाडा: (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातील ब्राम्हणवाडा येथील जिल्हा परिषद केंद्र शाळा येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले. या उपक्रमाचे नेतृत्व श्री. भानुदास आबाळे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली Being Volunteer संस्थेने केले.

या कार्यक्रमात श्री. घनश्याम पाटील सर, श्री. आकाश काटे सर, तसेच सौ. पायल मुजुमदार यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

उपक्रमात एप्रोच हेल्पिंग हॅन्डस फौंडेशन, पुणे व श्री. व श्रीमती रामनारायणजी बूब मेमोरियल ट्रस्ट, संगमनेर यांच्या सहकार्याने शालेय साहित्याची व्यवस्था करण्यात आली. विद्यार्थ्यांना आवश्यक त्या वह्या आणि इतर शालेय साहित्य वितरीत करण्यात आले.



या अभियानाअंतर्गत अकोले आणि संगमनेर परिसरातील ९,५०० विद्यार्थ्यांना आतापर्यंत प्रत्येकी तीन शालेय वह्या वितरित केल्या गेल्या आहेत.

उपक्रमाचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणे आणि त्यांना आवश्यक साहित्य उपलब्ध करून देणे हा आहे. Being Volunteer संस्था आणि सहयोगी संस्थांच्या प्रयत्नांमुळे या उपक्रमाला यश मिळाले असून, भविष्यातही सतत शालेय साहित्य वितरणाचे कार्य चालू ठेवण्याचे ठरवण्यात आले आहे.

# डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या वाढदिवसानिमित्त आळंदी येथील वारकऱ्यांना सोलापूर चादरींचे वाटप!

## नानजीभाई ठक्कर यांचे कार्य वारकरी सांप्रदायासाठी कौतुकास्पद – डॉ. विश्वासराव आरोटे!

**आळंदी : (समर्थ गांवकरी)**

“जोपर्यंत चंद्र-सूर्य आहेत तोपर्यंत हिंदुस्थानातील नामवंत समाजसेवक शेठ नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला यांचे कार्य स्मरणात राहील. आळंदी व पंढरपूर येथे वारकरी शिक्षण संस्थेचे रोपटे लावून त्यांनी वारकरी संप्रदायासाठी जे कार्य उभे केले,

ते नक्कीच प्रेरणादायी व कौतुकास्पद आहे,” असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी केले.

आळंदी येथील केंद्रे वारकरी शिक्षण संस्था यांच्या वतीने आयोजित सोलापूर चादर वाटप









कार्यक्रमप्रसंगी ते बोलत होते. डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या वाढदिवसानिमित्त आळंदी येथील वारकऱ्यांना कंबळ व चादरींचे वाटप करण्यात आले.

डॉ. आरोटे पुढे म्हणाले की, ठाणावाला यांनी संपूर्ण हिंदुस्थानात वारकरी परंपरेचा वारसा जपत तब्बल ८० हजार मंदिरे उभारली. या मंदिरांमधून समाजप्रबोधन घडावे, हाच त्यांचा प्रमुख उद्देश होता.

त्या काळातील सामाजिक परिस्थिती वेगळी असताना प्रत्येक गावात सात दिवसांचा जागर करून समाजजागृती करण्यात आली. “माणसांनी माणसातील माणूस ओळखावा, देव माणसात आहे, देव आई-वडिलांमध्ये आहे,” ही धारणा वारकरी शिक्षण संस्थेने समाजमनात रुजवली, असेही त्यांनी नमूद केले.

हा कार्यक्रम नामांकित कीर्तनकार, हरिभक्त परायण भास्कर महाराज पवार यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश प्रसिद्धी प्रमुख नवनाथ जाधव, दैनिक समर्थ गांवकरी समूहाचे महाव्यवस्थापक संजय फुलसुंदर, केंद्रे वारकरी शिक्षण संस्थेचे आळंदी येथील व्यवस्थापक भारती, महिला ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेच्या संचालिका सौ. परीघाताई आरोटे, कु. सोनेरी आरोटे, कु. छत्रपती आरोटे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात मान्यवरांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

डॉ. आरोटे यांनी आपल्या भाषणात शेठ नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला यांच्या जीवनकार्याचा विशेष उल्लेख करताना सांगितले की, “नानजीभाई हे देवाच्या रूपातच असून वयाच्या ८५व्या वर्षीही ते संपूर्ण हिंदुस्थानात सामाजिक दायित्व आपल्या कार्यातून निभावत आहेत.

‘परमेश्वराने मला भरपूर दिले आहे, मला कोणाची देणगी नको. माझ्या दारात येणारा प्रत्येक माणूस देवस्वरूप आहे आणि त्याच्यासाठी ३६५ दिवस, २४ तास दानधर्म करणे हा माझा गुणधर्म आहे,’ अशी त्यांची भूमिका आहे.”

तसेच सामाजिक, शैक्षणिक व वारकरी संप्रदायातील कार्य कोणत्याही राजकीय स्वार्थासाठी न वापरता, “राजकारण करायचे नाही; सर्वसामान्य जनतेच्या हृदयात आपला माणूस म्हणून ओळख निर्माण करायची,” हा संकल्प ठाणावाला यांनी आयुष्यभर जपला असल्याचेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित वारकऱ्यांना चादरींचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे वारकरी बांधवांत समाधान व आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

# 638 किलो गांजासह 2 कोटी 14 लाखांच्या मुद्देमालासह आरोपी अटकेत

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**



मालमत्ता कक्ष, गुन्हे शाखा, नेमणुकीतील पोलीस हवालदार जयकर जाधव यांना मिळालेल्या माहिती आधारे खारेगाव टोल नाक्याकडून कळवा बाजूकडे जाणारे रोडवर, इन्होवा कार क्र. AP-09-BF-9382 या वाहनातून ओडीसा व तेलंगना (आंध्रपंदेश) राज्यातून गांजा या अंमली पदार्थाची तस्करी करणारा इसम चिन्ना टागुर लक्ष्मण नायक वय 36 वर्षे रा. राज्य तेलंगना आघ्रप्रदेश यास ताब्यात घेवून त्याचेकडून 2,04,16,000/- रू. किमतीचा एकुण 638 किलो वजनाचा गांजा हा अंमली पदार्थ व 10,00,000/- रु. किमतीची इन्होवा कार असा एकुण 2,14,16,000/- रु. किमतीचा मुददेमाल हस्तगत करून त्याचेविरूध्द कळवा पोलीस ठाणे 958/2025 एन.डी. पी.एस. अॅक्ट 1985 चे कलम 8 (क), 20(ब), 29 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन सदर गुन्हयात एक आरोपी अटक करण्यात आला आहे. आरोपी यास दि. 03/01/2026 पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजूर दिला असून पुढील तपास मालमत्ता कक्षाकडून चालू आहे.

सदरची कारवाई ही मा. अपर पोलीस आयुक्त डॉ. श्री. पंजाबराव उगले (गुन्हे), मा. पोलीस उप आयुक्त श्री. अमरसिंह जाधव, गुन्हे, ठाणे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. विनय घोरपडे, गुन्हे शोध 2. गुन्हे, ठाणे, यांच्या मार्गदर्शनाखाली मालमत्ता गुन्हे कक्षाचे वपोनिरी/गोरखनाथ घार्गे, पोउनि/संजय भिसे, मपोउनि/शितल पाटील, सपोउनि/शिवाजी गायकवाड, पोहवा/4487 दिनेश कुंभारे, पोहवा /6567 प्रशांत भुर्के, पोहवा/6436 संदीप भांगरे, पोहवा/2788 महेश साबळे, पोहवा /2958 जयकर जाधव, पोहवा /4888 राहुल शिरसाठ, पोना/5799 सचिन कोळी, पोना/6626 तौसीफ सैयद, पोअं/8301 महेश सावंत, चापोअं/1029 सदन मुळे, तसेच मपोहवा /3192 आशा गोळे, मपोना/4085 गिताली पाटील यांनी केलेली आहे.



ठाणे : दिव्यात "मतदार राजा जागा हो.. लोकशाहीचा धागा हो" मतदान हा संविधानाने दिलेला अधिकार असून या अधिकाराचे पालन प्रत्येकाने करुन येत्या 15 जानेवारी 2026 रोजी होत असलेल्या ठाणे महापालिकेच्या निवडणुकीत मतदान करा अशी जनजागृती पथनाट्यच्या माध्यमातून दिवा शहरातील प्रभाग २७, २८ व २९ मधून करण्यात आली. (फोटो - संतोष पडवळ )

## थोडक्यात बातम्या...



### स्वारातीम विद्यापीठातील डॉ. डी. एम. खंदारे सेवानिवृत्त

नांदेड जिल्हा **(स. गांवकरी)** : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र संकुलातील वरिष्ठ प्राध्यापक डॉ. दत्ता मारुती खंदारे हे मंगळवार, दि. ३१ डिसेंबर, २०२५ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. यानिमित्त त्यांच्या सेवागौरव समारंभाचे आयोजन विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात करण्यात आले होते. हा समारंभ विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. यावेळी व्यासपीठावर प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, डॉ. पराग खडके, डॉ. चंद्रकांत बाविस्कर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे, वित्त व लेखाधिकारी डॉ. भालचंद्र पराग, सत्कारमूर्ती डॉ. डी. एम. खंदारे तसेच सौ. रत्नमाला खंदारे यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. खंदारे यांनी आपल्या शैक्षणिक कारकिर्दीत यशवंत महाविद्यालय, नांदेड येथे १५ वर्षे तसेच स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात २२ वर्षे अशा एकूण ३७ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेत विविध शैक्षणिक व प्रशासकीय पदांवर कार्य करत उल्लेखनीय योगदान दिले. त्यांनी व्यवस्थापनशास्त्र संकुलाचे संचालक म्हणून दोन वेळा जबाबदारी सांभाळली असून, विद्यापीठाचे प्रभारी वित्त व लेखाधिकारी म्हणूनही महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. तसेच शिक्षणशास्त्र संकुलात एम.पी.एड. समन्वयक, शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाचे संचालक, वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र संकुलात वाणिज्य व बिझनेस मॅनेजमेंट या विषयांचे विभागप्रमुख म्हणून त्यांनी प्रभावी कार्य केले. सन २०२३ पासून ते विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता म्हणून कार्यरत होते. याशिवाय विद्यापीठ व इतर विविध विद्यापीठांमधील ज्ञान समिती, संलग्नीकरण समिती, ट्रिपल ए समिती आदी अनेक महत्त्वाच्या समित्यांवर त्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला.

### स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड मुलांचा संघ रवाना



नांदेड जिल्हा **(स. गांवकरी)** : दि.२ ते ५ जानेवारी, २०२६ या कालावधीत चीतकारा विद्यापीठ, पंजाब येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ टेबल टेनिस स्पर्धेसाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड मुलांचा संघ सहभागी होणार आहे. संघातील खेळाडू आठवले आयुष, आठवले अमिष, रोहित जोशी, प्रतीक एडके व गिरगावकर कैवल्ले, मार्गदर्शक डॉ.अश्विन बोरीकर, संघ व्यवस्थापक डॉ.राजेंद्र तुपेकर सहभागी होणार आहेत. नुकत्याच १५ ते १९ डिसेंबर, २०२५ या कालावधीत महात्मा ज्योतिबा फुले विद्यापीठ, जयपूर येथे झालेल्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ टेबल टेनिस स्पर्धेत मुलांच्या संघाने तृतीय क्रमांक मिळवला आहे व अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे. विजय खेळाडू संघ व्यवस्थापक व मार्गदर्शक यांचे अभिनंदन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.मनोहर चासकर, प्र-कुलगुरू डॉ.अशोक महाजन, कुलसचिव डॉ.ज्ञानेश्वर पवार, क्रीडा संचालक डॉ.भास्कर माने, जनसंपर्क अधिकारी डॉ.अशोक कदम, संजयसिंह ठाकूर, राम किरकन, शिवाजी हंबर्डे, सुनील लुटे, सुभाष थेटे व रतनसिंग पुजारी विद्यापीठातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळेल : आमदार काशिनाथ दाते

### पारनेरमध्ये पठारे बंधूंच्या 'नॅचरल डेअरी' चा भव्य शुभारंभ

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**



पठारे बंधूंच्या नॅचरल डेअरीचा शुभारंभ हा पारनेरसाठी अभिमानास्पद क्षण आहे. २० वर्षांपासून सेंद्रीय पद्धतीने दूध पुरवठा करणाऱ्या या कुटुंबाचा नवा व्यवसाय यशस्वी होईल. शुद्ध व नैसर्गिक दुग्धपदार्थ ग्राहकांना मिळतील, यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळेल आणि रोजगार वाढेल. मी त्यांना शुभेच्छा देतो. असे मत आमदार काशिनाथ दाते यांनी व्यक्त केले. पारनेर शहरात प्रथमच पठारे डेअरी फार्मच्या 'नॅचरल डेअरी' चा भव्य शुभारंभ सोहळा गुरुवारी १ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता संपन्न झाला. एस.टी. स्टँडसमोर असलेल्या या नवीन डेअरी दुकानात स्वच्छ व उत्तम प्रतीचे गायी-म्हशीचे दूध, तूप, पनीर, खवा, बासुंदी, रसमलाई आदी नैसर्गिक पदार्थ उपलब्ध होतील. २० वर्षांपासून सेंद्रीय खतापासून बनवलेला चारा देऊन निरोगी जनावरांचे दूध पुरवठा करणाऱ्या पठारे बंधूंनी हा नवा व्यवसाय सुरू केला आहे. उद्घाटन सोहळ्यात पारनेर तालुक्याचे आमदार काशिनाथ दाते यांच्या प्रमुख उपस्थितीत फीत कापून दुकानाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरद पवार गट) जिल्हा उपाध्यक्ष अर्जुन भालेकर, भाजप तालुकाध्यक्ष राहुल पाटील शिंदे, शिवसेना तालुकाप्रमुख डॉ. श्रीकांत पठारे, माजी नगराध्यक्ष नितीन अडसूळ, डॉ. बाळासाहेब कावरे, सुभाष शिंदे, ज्येष्ठ नेते बाळासाहेब पठारे, बाजार समिती संचालक शंकर नगरे, सुपा माजी उपसरपंच दत्ता नाना पवार, लोकनियुक्त सरपंच लहू भालेकर, नगरसेवक अशोक चेडे, विजय भा. औटी, सागर मैड, नगरसेवक कांतीलाल ठाणगे, प्रगतशील शेतकरी कुंडलिक पठारे, नगरसेवक पै. युवराज पठारे, यशवंत पठारे, तेजस रेपाळे आदी मान्यवर उपस्थित होते.

> दूध व्यवसायाच्या माध्यमातून अनेक दिवसापासून कार्यरत आहे पारनेर शहर व परिसरातील ग्राहकांना दुधापासून बनवण्यात येणारी उत्पादने ही नॅचरल पद्धतीची मिळावीत म्हणूनच आम्ही नॅचरल डेरी ची सुरुवात केली आहे यापुढील काळात ग्राहकांच्या पसंतीस उतरू
> **- पै. युवराज पठारे (नगरसेवक, पारनेर)**

## प्राचार्य डॉ. महेंद्र अवघडे यांचा सेवानिवृत्ती सन्मान

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**



दिनांक: ३१ डिसेंबर, २०२५ रोजी पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे,अण्णासाहेब वाघिरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,ओतूर येथे आदरणीय प्राचार्य डॉ.महेंद्र अवघडे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवानिवृत्ती निमित्त अत्यंत सन्माननीय व भावनिक वातावरणात सेवानिवृत्ती सन्मान समारंभ संपन्न झाला.प्रदीर्घ, निष्ठावान व प्रेरणादायी शैक्षणिक सेवेसाठी महाविद्यालयाच्या वतीने त्यांचा यथोचित गौरव करण्यात आला.अशा प्रकारची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रमेश शिरसाट यांनी दिली. सेवानिवृत्ती समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. व्ही. एम.शिंदे यांनी डॉ.अवघडे यांनी NAAC/ IQAC समन्वय क म्हणून त्यांनी महाविद्यालयांच्या गुणवत्ता वाढीसाठी विशेष परिश्रम घेतले. संशोधन मार्गदर्शक म्हणून ४ पीएच.डी. संशोधकांना मार्गदर्शन केले. त्यांच्या संशोधनातून २८शोधनिबंध,८संदर्भग्रंथ व २ पाठ्य पुस्तके प्रकाशित होऊन शैक्षणिक विश्वात अमूल्य ठेवा निर्माण झाला. तसेच पुणे जिल्हा शिक्षण मंडळ सेवक सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदाची जबाबदारी त्यांनी यशस्वीपणे पार पाडली आहे."

## स्व. प्रदीप नाईक यांचे प्रथम पुण्यस्मरण



**किनवट : (समर्थ गांवकरी)**

किनवट-माहूर विधानसभा मतदारसंघाचे तीन वेळा प्रतिनिधित्व करणारे दिवंगत माजी आमदार स्व. प्रदीप नाईक यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त आज (दि. ०१) त्यांच्या पितृगाव दहेली तांडा येथे भावपूर्ण वातावरणात अभिवादन कार्यक्रम पार पडला. या निमित्ताने आयोजित कार्यक्रमास किनवट-माहूर विधानसभा क्षेत्रातील नागरिकांसह सामाजिक, राजकीय व विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात समाधीस्थळी विधीवत पूजा, प्रार्थना व भोगाने करण्यात आली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांनी स्व. प्रदीप नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहिली. स्व. नाईक यांनी आपल्या कार्यकाळात केलेल्या विकासकामांचा, सामान्य जनतेशी असलेल्या आत्मीय संबंधांचा उपस्थितांनी यावेळी आवर्जून उल्लेख केला. या प्रसंगी स्व. प्रदीप नाईक यांच्या परिवारातर्फे आलेल्या सर्व मान्यवरांचे व नागरिकांचे आदरातिथ्य करण्यात आले. यावेळी सौ. बेबीताई नाईक, युवा नेते कपिल नाईक, अॅड. राहुल नाईक, अॅड. अर्चित नाईक, अमित नाईक तसेच माजी जिल्हा परिषद सदस्य बंडूसिंग नाईक यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

## तहसील कार्यालयात राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा!

### ग्राहक मेळाव्यात तक्रारींचा पाऊस; अनुपस्थित अधिकाऱ्यांना नोटिसा देण्याचे तहसीलदारांचे निर्देश!

**अकोले : (समर्थ गांवकरी)**




अकोले तहसील कार्यालयाच्या पुरवठा विभागामार्फत मंगळवारी (दि. ३०) राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त ग्राहक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्यात विविध विभागांशी संबंधित समस्यांवर ग्राहक व कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणावर तक्रारी मांडत प्रशासनाचे लक्ष वेधले.

हा मेळावा तहसीलदार डॉ. सिद्धार्थ मोरे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे जिल्हा सचिव दिनेश थोरात, अकोले तालुका अध्यक्ष अशोकराव उगले, उपाध्यक्ष बाळासाहेब नवाळी, ओंकार अस्वले, सचिव कुलदीप घोलप, पुरवठा निरीक्षक निळे, तसेच महावितरणचे प्रतिनिधी शेळके उपस्थित होते. प्रारंभी स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. ग्राहक पंचायतीचे संस्थापक स्व. बिंदू माधव जोशी व जागतिक कीर्तीचे शिल्पकार पद्मश्री राम सुतार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

ग्राहक दिनानिमित्त आयोजित या मेळाव्यास ग्राहकांची विक्रमी उपस्थिती होती. मात्र संबंधित विभागांचे प्रमुख अधिकारी अनुपस्थित असल्याने उपस्थित ग्राहक व कार्यकर्त्यांनी नाराजी व्यक्त केली. प्रमुख अधिकारीच उपस्थित नसतील तर तक्रारींचे निराकरण कसे होणार, असा सवाल यावेळी करण्यात आला. यावर तहसीलदार डॉ. मोरे यांनी सर्व प्राप्त तक्रारी संबंधित अधिकाऱ्यांकडे पाठवून त्यांचे निराकरण करण्यात येईल, अशी ग्वाही दिली. तसेच अनुपस्थित अधिकाऱ्यांना नोटिसा पाठवून चौकशी केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

मेळाव्यात नगरपंचायत कर मूल्यांकन आकारणी, अकृषिक वापराची सनद (औद्योगिक प्रयोजन), महसूल विभागातील प्रलंबित अर्ज, नाशिक-पुणे रेल्वे प्रकल्प, घरगुती गॅस वितरण, शहरातील ड्रेनेजचे सांडपाणी, कोल्हार-घोटी राज्यमार्गावरील अपूर्ण कामे, अकोले ग्रामीण रुग्णालयातील सुविधा, शिधापत्रिका, अवैध व्यवसाय, ३२ गाव पाणीपुरवठा योजना, बिबट्यांचे हल्ले, अभिलेख विभाग, बीएसएनएल सेवा आदी विविध विषयांवर सविस्तर चर्चा झाली.

ग्राहकांच्या समस्यांचे वेळेत व प्रभावी निराकरण होण्यासाठी प्रशासनाने अधिक सक्रिय भूमिका घ्यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

## जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात...**

क्र.कावि/जन्म/मृत्यु नोंद/५४/२०२५ अकोले दि. २४/१२/२०२५

तमांम नागरिकांस कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार **श्री. निवृत्ती सतु सदगीर, रा.मुथाळणे**, ता. अकोले, जि. अहिल्यानगर यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३(३) अन्वये **अर्जदार यांचे भाऊ कै. विठ्ठल सतु सदगीर यांचा मृत्यू दि. ३०/१०/२०१५** रोजी **मौजे मुथाळणे** येथे झाला असुन त्यांच्या **भावाच्या** मृत्यूची नोंद **ग्रामपंचायत कार्यालय मुथाळणे**, ता.अकोले यांचे जन्म-मृत्यु रजिस्टरला नोंद आदेश होणेकामीचा अर्ज मे तहसिल कार्यालय येथे दाखल केला आहे.

तरी **श्री. निवृत्ती सतु सदगीर, रा.मुथाळणे**, ता. अकोले जि. अहिल्यानगर **अर्जदार यांचे भाऊ कै. विठ्ठल सतु सदगीर यांचा मृत्यू दि. ३०/१०/२०१५** रोजी **मौजे मुथाळणे** येथे झाला असल्याची नोंद **ग्रामपंचायत कार्यालय मुथाळणे**, ता. अकोले येथे मृत्यूची नोंद होण्याबाबत कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या पुराव्यांसह हरकत मे. कोर्टासमोर हजर होऊन पुराव्या निशी दाखल करावी अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर मृत्यूची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही, असे समजुन मे. न्यायालय पुढील योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि. २४/१२/२०२५ रोजी सही व शिक्क्यानिशी दिले असे.

**कामगिरी क्लर्क**

**हुकूमावरुन,
तहसिलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी, अकोले**

## “खुर्ची सत्तेची नाही, लोकशाही बळकट करण्याची” - नगराध्यक्ष

**श्रीगोंदा तालुका: (समर्थ गांवकरी)**



“नगराध्यक्षपद ही सत्तेची खुर्ची नसून लोकशाही अधिक मजबूत करण्याचे साधन आहे,” असे ठाम आणि परखड शब्दांत सांगत सुनिता संतोष खेतमाळीस यांनी श्रीगोंदा नगरपालिकेच्या नगराध्यक्षपदाचा पदभार स्वीकारला. सामान्य जनतेच्या विश्वासावरच आपली राजकीय वाटचाल उभी राहील, असा निर्धार व्यक्त करत त्यांनी दुःखापासून सुखापर्यंत कायम पाठिशी उभे राहिलेल्या पाचपुते कुटुंबाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. नव्या वर्षाच्या पहिल्याच दिवशी झालेल्या या पदभार सोहळ्याने श्रीगोंदा शहराच्या राजकारणात नव्या पर्वाची सुरुवात झाल्याचे चित्र दिसून आले. या वेळी बोलताना आमदार विक्रम पाचपुते यांनी, “सर्वसामान्य माणसाच्या वेदना जाणणारी, जमिनीवर पाय असलेली नगराध्यक्षा शहराला मिळाली आहे. हा विश्वास सार्थ ठरवण्याची जबाबदारी आता सर्वांची आहे,” असे ठामपणे सांगितले. विजयी नगरसेवकांनी अहंकार न ठेवता जनतेची सेवा करावी, तर पराभूत उमेदवारांनीही नाराजी बाजूला ठेवून शहराच्या विकासासाठी हातात हात घालून काम करावे, असे स्पष्ट आवाहन आमदार पाचपुते यांनी केले. शहरासह वाडी-वस्तींच्या सर्वांगीण विकासासाठी आपण कटिबद्ध असल्याचे सांगत शास्ती माफीसाठी राज्य सरकारकडे प्रस्ताव पाठवून त्याचा पाठपुरावा सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली. शहराच्या विकासासाठी आवश्यक निधी आणण्यासाठी ठोस प्रयत्न केले जातील, अधिकारी व कर्मचारी यांनी सकारात्मक सहकार्य करावे, जात-धर्म न पाहता विकास हेच एकमेव धोरण राहील, असा स्पष्ट राजकीय संदेश त्यांनी दिला. नगरसेवकांना प्रशिक्षण देण्याचा निर्णय, पालिकेत जनता दरबार सुरू करण्याचा मानस, तसेच नगराध्यक्ष व नगरसेवकांनी सभागृहात अधिक वेळ देऊन लोकांच्या प्रश्नांवर गांभीर्याने चर्चा करावी, यावरही आमदार पाचपुते यांनी भर दिला. “निवडणुकीत कोणी काय भूमिका घेतली, कोणी अडथळे आणले याची मला पूर्ण माहिती आहे; वेळ आल्यावर ते दाखवून देऊ,” असा इशाराही त्यांनी यावेळी दिला. श्रीगोंदेकर जनतेचे आभार मानत त्यांचा विश्वास कधीही डळमळीत होऊ देणार नाही, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

माजी मंत्री बबनराव पाचपुते यांनीही नगरपालिकेत ठोस, आदर्श आणि लोकाभिमुख काम करून कायमस्वरूपी ओळख निर्माण करण्याचे आवाहन केले. जनतेचे प्रश्न तातडीने सोडवा, सद्गुरू संत शेख महंमद महाराज मंदिराचा प्रलंबित प्रश्न लवकर मार्गी लावा, शहराच्या विकासासाठी मी सदैव तुमच्या पाठीशी आहे, तसेच मुख्यमंत्र्यांकडील कामांसाठी स्वतः पाठपुरावा करणार असल्याचे आश्वासन त्यांनी दिले.

या सोहळ्यात नगराध्यक्ष सुनिता संतोष खेतमाळीस यांनी आमदार विक्रम पाचपुते यांच्या उपस्थितीत अधिकृत पदभार स्वीकारला. यावेळी सर्व नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला. एकजुटीचा, विकासाचा आणि लोकहिताचा संदेश देत श्रीगोंदा शहराला नवी दिशा देण्याचा संकल्प या पदभार सोहळ्यातून ठळकपणे व्यक्त झाला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, अॅड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)